09-04-2025-Dai-04_DH_PAN_20_08_2016-3.qxp 04/08/2025 10:36 PM Page 1



## निवडक

### केदार जाधव करणार राजकारणात प्रवेश



**मुंबई, दि. ८ :** माजी भारतीय क्रिकेटपटू केदार जाधव आजपासून राजकारणात उतरत आहे. तो दुपारी ३ वाजता भारतीय जनता पक्षात प्रवेश करणार आहेत. पुण्याचा रहिवासी असलेले ४० वर्षीय केदार जाधव मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत पक्षात सहभागी होईल. या वेळी भाजपचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळेही उपस्थित असण्याची शक्यता आहे. राजकीय इनिंग सुरू करण्याआधी केदार जाधवने महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मंत्री रवींद्र चव्हाण यांची भेट घेतली होती. यानंतर त्यांनी मुंबई क्रिकेट असोसिएशनचे माजी अध्यक्ष आणि भाजप नेते आशिष शेलार यांच्यासोबतही चर्चा केली. त्यावेळीच त्यांच भाजपमध्ये जाणे निश्चित असल्याच्या चर्चा रंगल्या होत्या. आज त्या चर्चांना पूर्णविराम देत केदार जाधव अधिकृतरित्या भाजपमध्ये सामील होत आहे. आता मैदानावर दमदार फटकेबाजी केलेला हा खेळाडू, राजकारणाच्या मैदानात किती प्रभावी ठरतो, हे पाहणं रंजक ठरेल. केदार जाधव हा धोनीचा आवडता खेळाडू मानला जातो. त्याचे आंतरराष्ट्रीय पदार्पण धोनीच्या नेतृत्वाखाली झाले. २०१४ ते २०२० पर्यंत त्याने भारतासाठी ७३ एकदिवसीय आणि नऊ टी-२० आंतरराष्ट्रीय सामने खेळले. त्याच्या नावावर एकदिवसीय सामन्यात दोन शतके आणि सहा अर्धशतके आहेत, तर टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यात तो फक्त एक अर्धशतक करू शकला. २०१० मध्ये आयपीएलमध्ये पदार्पण केल्यानंतर, त्याने पाच वेगवेगळ्या संघांसाठी आपली ताकद दाखवली. त्याने ९५ आयपीएल सामन्यांपैकी ८१ डावात १२०८ धावा केल्या.

---


अमृता पाटील


निती बोरकर


ज्योती कुमारी

### दामोदर विद्यालयाचा दहावीचा निकाल उत्तम

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**मडगाव, दि. ७ :** मठग्रामस्थ हिंदु सभेच्या कोंब, मडगाव येथील श्री दामोदर इंग्रजी हायस्कूलचा गोवा बोर्डाच्या दहावी परिक्षेचा चांगला निकाल चांगला लागला. ५० विद्यार्थ्यांपैकी १५ विद्यार्थी डिस्टीक्शन, १७ विद्यार्थी प्रथम श्रेणी, १५ विद्यार्थी द्वितीय श्रेणी, व १ विद्यार्थी पास श्रेणीत उत्तीर्ण झाला. ९ विद्यार्थ्यांनी ८० टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळवले. अमृता पाटील या विद्यार्थीनेने ९६ टक्के गुण मिळवले. निती बोरकर या विद्यार्थीनेने ८९.५ टक्के गुण मिळवले. ज्योती कुमारी या ८९ टक्के गुण मिळवले. मार्च २०२५ च्या गोवा बोर्डाच्या दहावी परिक्षेत चांगला निकाल मिळवल्याबद्दल मठग्रामस्थ हिंदु सभेचे अध्यक्ष भाई नाईक यांनी विद्यार्थी, पालक, मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले आहे.

---

### विभुती भैरेलीने शालान्त परीक्षेत प्रथम

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**काणकोण,दि. ८ :** श्री निराकार शिक्षण संस्था माशे काणकोण संचलित श्री निराकार विद्यालयची विद्यार्थिनी विभुती भैरेली हिने शालान्त परीक्षेत ९५.१७ टक्के गुण मिळवून काणकोण तालुक्यातून प्रथम येण्याचा मान मिळविला. श्री निराकार विद्यालयांतून एकुण ४१ विद्यार्थी परीक्षेला बसले होते त्यांतील ४० विद्यार्थी उत्तीर्ण झाले व विद्यालयाचा निकाल ९७.५० टक्के लागला. याच संस्थेतर्फे गांवडोंगरी येथे चालविण्यात येणा-या तुडल हायस्कूलमधील ३४ विद्यार्थ्यांपैकी ३३ विद्यार्थी उत्तीर्ण होवून एकंदर निकाल ९७ टक्के लागला. या विद्यालयाच्या प्राची गांवकर हिने ८५.८० टक्के गुण मिळवून विद्यालयांत प्रथम क्रमांक पटकावला. निराकार विद्यालयाचे १० विद्यार्थी विशेष श्रेणीत, २१ विद्यार्थी प्रथम श्रेणीत व ९ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत पास झाले तर तुडल हायस्कूलमधील ११ विद्यार्थी विशेष श्रेणीत, १६ विद्यार्थी प्रथम श्रेणीत व ६ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत पास झाले. एका विद्यार्थ्याला एटीकेटी मिळाली. वर्ष पध्दती प्रमाणे यावर्षीही दोन्ही शाळांचा गुणवत्तापूर्ण निकाल आणल्या बद्दल संस्थेचे अध्यक्ष प्रशांत नाईक यांनी दोन्ही शाळांचे मुख्याध्यापक ऊर्वी फळदेसाई व तुकाराम वेळीप तसेच सर्व शिक्षकांचे अभिनंदन केले आहे.

---

### संस्कृती संवर्धन प्रतिष्ठान उत्तर गोवाचा १४ रोजी पुरस्कार वितरण सोहळा

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**म्हापसा, दि. ८ :** संस्कृती संवर्धन प्रतिष्ठान उत्तर गोवाचा पुरस्कार वितरण सोहळा सोमवार दि. १४ रोजी सकाळी १० वाजता श्री गणेश विद्या मंदिर गणेशपुरी म्हापसा येथे होणार आहे.

या समारंभा प्रमुख पाहुणे म्हणून विश्व हिंदू परिषद उत्तर गोवा प्रमोद सांगोडकर डॉक्टर स्नेहल गोलतेकर ए. आय जी.पी, सामाजिक कार्यकर्ते तथा उद्योजक राकेश अग्रवाल संकृती संवर्धन प्रतिष्ठान अध्यक्ष संतोष नाईक विभाग मंत्री मोहन आमशेकर, संकृती संवर्धन प्रतिष्ठान संस्थापक तर सचीव मोहन सालेकर (मुंबई), संजय दिवकर डेप्युटी एज्युकेशन आफिसर आदी उपस्थित राहणार आहेत



हरमल : विजेत्या संघास चषक प्रदान करताना आमदार जीत आरोलकर. सोबत सरपंच अनुपमा मयेकर, सोनाली माज्जी, संतान फर्नांडिस, अनंत गडेकर व इतर.

# हरमल लीग क्रिकेट स्पर्धेत ओम स्काय रायडर्स विजेता

## ९६ रायझर्स उपविजेता

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**हरमल, दि. ८ :** महापुरुष स्पोर्ट्स क्लब आयोजित हरमल लीग क्रिकेट स्पर्धेत ९६ रायझर्स संघाचा पराभव करून ओम स्काय रायडर्स संघाने जेतेपद पटकावले. या स्पर्धेत ८ संघांनी भाग घेतला होता.


मधलावाडा भाटले मैदानावर खेळविण्यात आलेल्या स्पर्धेतील विजेत्या संघास रोख व आकर्षक बक्षिसे देण्यात आली. वैयत्किक गटात उत्कृष्ठ फलंदाज सचिन महाले,उत्कृष्ठ गोलंदाज सुयश ठाकूर, मालिकावीर व ऑरेंज कॅप सुदन ठाकूर, पर्पल कॅप सुयश ठाकूर यांना देण्यात आली. बक्षीस वितरण सोहळ्यात प्रमुख पाहुणे मांद्रे मतदारसंघाचे आमदार जीत आरोलकर उपस्थित होते.

खेळाडूंनी शरीर तंदुरुस्तीसाठी नेहमीच कौशल्य जपले पाहिजे.खेळातून करीयर घडवता येते,त्यामुळे उत्कृष्ठ खेळ व स्वास्थ्य आवश्यक आहे. मांद्रे येथे सर्व सोयीनियुक्त स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स मंजूर झाले असून, त्याचा लाभ खेळाडूंना होईल,असे आमदार जीत आरोलकर यांनी व्यक्त केले. माजी सरपंच अनंत गडेकर यांनी मनोगत व्यक्त केले.

यावेळी व्यासपीठावर सरपंच अनुपमा मयेकर उपसरपंच सोनाली माज्जी, पंच संतान फर्नांडिस, सुशांत गावडे, भिकाजी नाईक, माजी सरपंच अनंत गडेकर, विनय गडेकर, सुशांत रामजी, हेमंत सावंत, हरेश मयेकर आदी उपस्थित होते. सूत्रनिवेदन अक्षय महाले तर सज्जन गडेकर यांनी आभार मानले.

# आरसीबीच्या कर्णधाराला १२ लाखांचा दंड

**मुंबई, दि. ८ :**



सोमवारी रात्री मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर झालेल्या मुंबई इंडियन्स विरुद्धच्या सामन्यात स्लो ओव्हर रेटसाठी रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाचा कर्णधार रजत पाटीदारला १२ लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे.

आयपीएलने जारी केलेल्या निवेदनात असे म्हटले आहे की, रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा या हंगामातील पहिला सर्वात कमी षटकांचा वेग आहे. त्यामुळे नियमांच्या कलम २.२ अंतर्गत कर्णधार रजत पाटीदार यांना १२ लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे.

रजत हा चौथा कर्णधार आहे ज्याला स्लो ओव्हर्ससाठी दंड ठोठावण्यात आला

या हंगामात संथ षटकांसाठी दंड आकारण्यात आलेला रजत हा चौथा कर्णधार आहे. रजत पाटीदारपूर्वी, मुंबईचा कर्णधार हार्दिक पंड्या, राजस्थान रॉयल्सचा कर्णधार रियान पराग आणि लखनऊ सुपर जायंट्सचा कर्णधार ऋषभ पंत यांना या हंगामात स्लो ओव्हर रेटसाठी दंड ठोठावण्यात आला आहे.

ाल मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर झालेल्या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने (आरसीबी) मुंबई इंडियन्स (एमआय) ला १२ धावांनी पराभूत केले. प्रथम फलंदाजी करताना आरसीबीने २२१ धावा केल्या, ज्याच्या प्रत्युत्तरात मुंबई इंडियन्स फक्त २०९ धावा करू शकले. या सामन्यात रजतने फक्त ३२ चेंडूत ५ चौकार आणि ४ षटकारांच्या मदतीने ६४ धावा केल्या.

त्याच वेळी, विराट कोहलीने ४२ चेंडूत ६७ धावा, देवदत्त पडिकलने २२ चेंडूत ३७ धावा आणि जितेश शर्माने १९ चेंडूत ४० धावा केल्या. आरसीबी ४ सामन्यांत ३ विजयांसह पॉइंट टेबलमध्ये तिसऱ्या स्थानावर आहे. तर मुंबई इंडियन्स आठव्या क्रमांकावर आहे. आरसीबीचा पुढील सामना १० एप्रिल रोजी दिल्ली कॅपिटल्स विरुद्ध होईल. दिल्लीने या हंगामात अद्याप एकही सामना गमावलेला नाही.



न्हावेली-साखळी : 'संगीत राजा रुक्मांगद' नाटकातील कलाकार.

# 'संगीत राजा रुक्मांगद' नाटकास उत्स्फूर्त प्रतिसाद

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**साखळी, दि. ८ :** न्हावेली साखळी येथील श्री देव रवळनाथ देवस्थानात रामनवमीनिमित्त श्री रवळनाथ भजनी मंडळातर्फे वासुदेव गुणाजी मांद्रेकर लिखित तीन अंकी पौराणिक 'संगीत राजा रुक्मांगद' हे नाटक सादर करण्यात आले या नाटकाला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

यात प्रितेश दि.गावस, लवु अ.गावस, केतन के. गावस, संजू गावस, नीलेश गावस, प्रवीण गावस, नीलेश गावस, सुंदर उर्फ अजय गावस, साहिल गावस, आदर्श गावस, देवांश गावस, सोनिया शेट्ये, रुतवा गावस या कलाकारांनी भाग घेतला, नाटकाचे दिग्दर्शन जितेंद्र गावस यांचे होते. निर्माता रूपेश गावस, तर तबल्यावर पं. तुळशीदास नावेलकर, संगीत दिग्दर्शक महेश गावस, पार्श्वसंगीत विनय गावस यांचे होते. पखवाजसाथ आकाश गावस यानी केली. विशेष सहाय्य सुनील ह.गावस व राजू रा.गावस, राघवेंद्र दामले यांचे लाभले.

### त्रिंबक येथे श्रीराम नवरात्रोत्सवात किरण बुवा तुळपुळे यांची कीर्तने संपन्न

■ *टीम दैनिक हेराल्ड*



**डिचोली, दि. ८ :** त्रिंबक प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षी श्री रामेश्वर मंदिर त्रिंबक (आचरा) येथे श्रीरामनवरात्रोत्सवानिमित्त सिंधुदुर्ग सुपुत्र गोव्यात स्थायिक असलेले सुप्रसिद्ध राष्ट्रीय कीर्तनकार ह भ प किरणबुवा तुळपुळे - डिचोली गोवा यांची कीर्तने ३० मार्च ते ८ एप्रिल दरम्यान गुढी पाडवा ते एकादशी पर्यंत आयोजित करण्यात आली होती. तुळपुळे बुवांची कर्नाटक गोवा महाराष्ट्र बडोदा कानपूर मुंबई अशा अनेक ठिकाणी कीर्तने झाली आहेत. दूरदर्शनवर अनेक वेळा त्यांच्या कीर्तनांचे प्रसारण झाले आहे.

उत्कृष्ट गायन, अभिनय युक्त निरूपण, स्पष्टवक्तेपणा, वैशिष्ट्ये आहेत. राष्ट्रभक्ती वरील कीर्तने राष्ट्रभक्ती जागृत करणारी असतात. कीर्तनात कोणताही विरश्रीचा तसेच, करूण रसाचे प्रसंग मनाचा ठाव घेणारे असतात.

ते उत्कृष्ट दशावतारी नाट्यकलाकारही आहेत. नारद या भूमिकेसाठी त्यांना हे प्रथम पारितोषिके मिळाली आहेत. राजा, इंद्र, नारद, अर्जुन, विरभद्र, अशा अनेक भूमिका त्यांनी साकारलेल्या आहे, त्यांना अनेक पुरस्कारही प्राप्त झालेले आहेत. मागीलवर्षीप्रमाणे यावर्षीही त्रिंबकच्या श्रोत्यांना त्यांच्या बहारदार कीर्तनाचा लाभ मिळाला, त्यांना संवादिनीवर - गजानन गद्रे (नारींग्रे) व तबल्यावर तुषार सुतार (पुरळ) यांची उत्कृष्ट साथ लाभली.



साखळी : डॉ. के. ब. हेडगेवार विद्यामंदिरचे विद्यार्थी. सोबत शिक्षकवर्ग.

# साखळी हेडगेवार विद्यामंदिरचा १०० टक्के निकाल

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**डिचोली, दि. ८ :** डॉ. के. ब. हेडगेवार विद्यामंदिर, कारापूर-तिस्क यांनी सलग चौथ्या वर्षी १००% निकालाची परंपरा कायम राखली आहे. यावर्षी एकूण ४० विद्यार्थी परीक्षेला बसले होते त्यात ८ विद्यार्थ्यांनी ९०% पेक्षा अधिक गुण मिळवले आहेत. एकूण २७ विद्यार्थ्यांना प्राविण्य, ११ विद्यार्थ्यांना प्रथम श्रेणी तर २ विद्यार्थ्यांना द्वितीय श्रेणी प्राप्त झाली आहे.

विहा राणे सरदेसाई ९६% मिळवत शाळेत पहिली,अनुश्री संभाजी ९५% व एंजेल सूर्यवंशी ९५% मिळवून अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांक मिळवला. त्याचबरोबर वैष्णवी धावस्कर ९४%, निहारिका देऊळकर ९३%, वर्धा वळवईकर ९३%, आर्या ठाकूर ९२% व खुशी गावस ९०% यांनी घवघवीत यश संपादन केले.

सलग चार वर्षे शंभर टक्के निकालासाठी शाळेचे सगळीकडे कौतुक होत असून शाळेचे व्यवस्थापन मंडळ, मुख्याध्यापक सदानंद मिशाळ, पालक व शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

# बांदोडकर पणजी जिमखाना टेनिस ओपन २०२५; भाव्या तिथी उपांत्य फेरीत दाखल

■ *टीम दैनिक हेराल्ड*



**पणजी, दि. ८ :** भाव्या भुमकारने बांदोडकर पणजी जिमखाना टेनिस ओपन २०२५ स्पर्धेत आपल्या दमदार कामगिरीने प्रेक्षकांची मने जिंकली आहेत. १४ वर्षांखालील गटात उपांत्य फेरी गाठत तिने आपली क्षमता सिद्ध केली, तर १८ वर्षांखालील गटासह महिला एकेरी गटात उपांत्यपूर्व फेरीपर्यंत मजल मारत तिच्या खेळातील सातत्य दिसून आले. आता भाव्या महिला एकेरी गटाच्या उपांत्य फेरीत अव्वल मानांकित तिथी भुमकरच्या विरुद्ध कोर्टवर उतरणार आहे. या सामन्याची खासियत अशी की, तिथी ही भाव्याची मोठी बहीण आहे, त्यामुळे ही लढत केवळ स्पर्धात्मक नसून भावनिकही ठरण्याची शक्यता आहे. प्रेक्षकांसाठी हा सामना एक विशेष आकर्षण ठरणार आहे.

भाव्या भुमकारने महिला एकेरीत लिझा जॉर्जचा ६-२ असा सहज पराभव करत आपली विजयी घोडदौड कायम राखली, तर तिथी भुमकारनेही समारा सिक्रेरावर ६-१ असा वर्चस्वपूर्ण विजय मिळवत पुढील फेरीत प्रवेश केला. दोघीही बहिणी आता उपांत्य फेरीत आमनेसामने येणार असल्याने हा सामना विशेष लक्षवेधी ठरणार आहे. महिला एकेरीच्या इतर सामन्यांमध्ये, असुंथा फ्लेमिंगने रेनी डी मिनेझिसचा ६-० असा एकतर्फी पराभव केला, तर आस्था दुआने दीवा साहनीला ६-३ ने परतवले. पूजल नाईकने अवनी लोटलीकरवर वर्चस्व गाजवत ६-० असा विजय मिळवला, तर किम्बर्ली काब्रालनेही देवयानी देसाईचा तितक्याच फरकाने पराभव केला. रायझा मिनेझिसने अर्चना देसाईवर ६-१ अशी मात करत आपले आव्हान पुढील फेरीत टिकवून ठेवले.

१४ वर्षांखालील मुलांच्या गटात , शौर्य वेर्लेकरने वेदांत नाईकचा ६-२ असा पराभव केला, तर अरहान गांवकरने आदियंता देवरायावर ७-५ असा विजय मिळवला. इथन अताइडने देवांश नाईकवर ६-१ असा विजय मिळवला आणि क्यान मावानीने ॲलेक बरेटोचा ६-० असा पराभव केला. १८ वर्षांखालील मुलांच्या गटात पुनित फडतेने कृष्णा वळवीकरचा ६-० असा एकतर्फी पराभव करत दमदार कामगिरी केली, तर देवांश नाईकने विदाल डी मिनेझिसविरुद्ध ६-४ असा संघर्षपूर्ण विजय मिळवला.

पुरुष एकेरीच्या सामन्यांमध्ये प्रजात हळणकरने रेहान डियाझचा ६-३ असा पराभव केला, तर सिद्धार्थ नूनेसने कृष्णा वळवयकरवर ६-१ असा सहज विजय मिळवला. संतोष गोरावरने भालचंद्र गायतोंडेचा ६-२ असा पराभव करत आपली आगेकूच कायम ठेवली, तर पुनीत फडतेने जोशुआ कार्दोझोवर ६-१ अशी मात केली. तनय आमोणकरने श्रेयस पाटीलविरुद्ध ६-४ असा विजय मिळवत पुढील फेरीत आपले स्थान निश्चित केले.

पुरुष दुहेरीत, राहुल पिंटो आणि जुवावं मेरगुल्हाओ यांनी सीझर कोस्ता आणि गॅरी स्टील यांचा ६-१ असा पराभव केला. नवीन दैवज्ञ आणि नेव्हिल मिनेझिस यांनी विक्रांत करंदीकर आणि सूरज पोम्ब्रा यांचा ६-० असा पराभव केला, तर जेम्स दरबार आणि ॲलन फर्नांडिस यांनी नीनद देसाई आणि विनोद चंद्रा यांचा ७-५ असा पराभव केला. ओजस्वी मान आणि सौरिश नाईक यांनी जेम्स स्टीवर्ट आणि सत्या स्टीवर्ट यांचा ६-२ असा पराभव केला आणि तनय आमोणकर यांनी मनोज पांडे यांच्यासोबत भागीदारी करून जोशुआ कार्डोझो आणि केन परेरा यांचा ६-१ असा पराभव केला.

मास्टर्स ४५ वर्षांवरील एकेरी गटात दिमित्री स्मिर्नोव्हने दमदार कामगिरी करत उपांत्य फेरीत प्रलय बक्षीचा ६-०, ६-१ असा सरळ सेटमध्ये पराभव केला. याआधी उपांत्यपूर्व फेरीत कायतांनो फर्नांडिसने विनित दीक्षितविरुद्ध खेळताना ६-४ असा चुरशीचा विजय मिळवून उपांत्य फेरीत प्रवेश केला.




### लाटंबार्से पंचक्रोशीतील अंगणवाडी बालकांना खावू वाटप

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**साळ, दि. ८:** लाटंबार्से पंचायतीच्या माजी सरपंच तसेच नानोडा गावच्या पहिल्या महिला सरपंच स्व. शामल शाम हरमलकर यांच्या द्वितीय वार्षिक स्मृतिदिनी नानोडा प्राथमिक शाळा आणि लाटमबारसे पंचक्रोशीतील नानोडा, उसप, सावरधाट, कासारपाल, वडावल, खरपाल (मधला वाडा), खरपाल (वरचा वाडा), खरपाल (मुड्डेर), दोडामार्ग (फणसवाडी) आणि लाडफे शाळेतील अंगणवाडी बालकांना स्व. शामल हरमलकर यांचे पती माजी सरपंच शाम हरमलकर आणि कुटुंबियांतर्फे बिस्किटांचे नुकतेच वाटप करण्यात आले. नानोडा प्राथमिक शाळा आणि पंचक्रोशीतील अंगणवाडी बालके मिळून एकूण ३४५ जणांना बिस्किटांचे प्रत्येक शाळेत शाळेतील शिक्षक तसेच अंगणवाडी सेविकांकडून मुलांना सकाळच्या वेळेला वाटप करण्यात आले. स्तुत्य उपक्रम राबविल्याबद्दल पंचायतीचे सरपंच डॉ. रामा गावकर इतर पंचायत सदस्य व शाळेतील पालक शिक्षक वर्गाकडून अशा उपक्रमाचे स्वागत करून कुटुंबीयांचे आभार मानले.

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक २१६ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल - १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल - १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 216 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .